International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.1 Sept-Oct 2023

# महाराष्ट्रातील मराठवाडा प्रादेशिक विभागाच्या मानव विकास निर्देशांकाचा सापेक्ष स्तर

**कु. राणी नवनाथराव पावडे[१],प्रा. डॉ. संभाजी भाऊराव काळे[२]**
[१]संशोधक विद्यार्थिनी, एम. ए.(अर्थशास्त्र) , सेट.
[२]मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जिजामाता विज्ञान व कला महाविद्यालय,
भेंडा, ता. नेवासा, जि. अहमदनगर.
**Corresponding Author – कु. राणी नवनाथराव पावडे**
**Email:** ranipawde1@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.10250227**

**गोषवारा (Abstract) :**

आधुनिक भारतीय अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांनी आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास यांच्यातील फरक स्पष्ट केला. त्यांनी लोकांना लक्षात आणून दिले की, विकासाचे मोजमाप केवळ उत्पन्नाद्वारे न करता विकासाच्या मोजमापामध्ये सामाजिक घटकांचा समावेशदेखील करण्यात यावा तरच विकासाचे मापन योग्य प्रकारे झाले असे म्हणता येईल. 'मानव हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे'. या विधानाने विकासाची संकल्पना मानव केंद्रित बनवली आहे. विकासाचे मोजमाप आर्थिक तसेच सामाजिक दृष्टिकोनातून केले जावे या विचाराच्या प्रेरनेतूनच UNDP कडून मानव विकास निर्देशांकाची निर्मिती करण्यात आली. प्रस्तुत शोध निबंधात महाराष्ट्रातील मराठवाडा प्रादेशिक विभागाचा मानव विकास निर्देशांक अभ्यासण्यात आला आहे.

**प्रस्तावना (Introduction) :**

मानवी विकास म्हणजे लोकांच्या निवडीच्या कक्षा विस्ताराच्या प्रक्रियेबरोबरच सुस्थिती उंचावण्यासाठीची प्रक्रिया होय. मानवी विकासाच्या सर्वात महत्त्वाच्या घटकांमध्ये दीर्घ व निरोगी जीवनशिक्षण व उत्तम , राहणीमानाचा दर्जा यांचा समावेश होतो इतर निवडीमध्ये राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्काची हमी आणि स्वावलंबन व आत्मप्रतिष्ठेचे विविध घटक यांचा समावेश होतो. एकंदरीत मानवाचा केवळ आर्थिक विकास नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, मानसिक, आणि सांस्कृतिक अशा सर्व बाजूंनी विकास घडवून आणणे म्हणजे मानव विकास होय. विकासाचे घटक काळानुरूप बदलणारे असल्यामुळे मानव विकासचे मोजमाप करणे ही एक जटिल व किचकट प्रक्रिया आहे. विकासाची संकल्पना काळानुरूप बदलणारी असून सद्य स्थितीत मानवी विकास हेच विकासाचे अंतिम साध्य मानले जात आहे. त्यामुळे मानवी विकासाचे मोजमाप करण्याची प्रक्रिया महत्त्वाची ठरते.

सन १९९० साली संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रम यांनी पहिला मानव विकास अहवाल प्रकाशित केला . अहवालात मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधीचा परिघ मोठा करण्याची प्रक्रिया होय असे सांगण्यात आले. तसेच मानव विकास निर्देशांक कसा मोजायचा याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. अहवालात पहिल्यांदाच सामाजिक तसेच आर्थिक घटकांवर आधारित मानव विकास निर्देशांक तयार करण्यात आला. मानव विकास निर्देशांक तयार करण्याचे श्रेय पाकिस्तानी अर्थतज्ज्ञ डॉ. महबूब उल-हक यांना जाते. यामध्ये भारतीय अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांचे देखील मोलाचे योगदान आहे. यांच्यामुळेच निर्देशांकास शास्त्रीय स्वरूप प्राप्त झाले. मानव विकास निर्देशांकाचे मूल्य ० ते १ च्या दरम्यान असून निर्देशांकाचे मूल्य जेवढे १ च्या जवळ असेल तेवढा देशाचा विकास चांगला आहे असे मानले जाते .आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी या दोन संकल्पनेपेक्षा मानव विकास ही संकल्पना अधिक व्यापक स्वरूपाचे आहे. मानव विकास संकल्पनेत आर्थिक वृद्धी आणि विकास संकल्पने पेक्षा इतर महत्त्वपूर्ण सामाजिक निर्देशांकाचा विचार केला जातो. त्यामध्ये प्रामुख्याने सरासरी आयुर्मानशालेय शिक्षणाची , )अपेक्षित वर्षेEYS), शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे(MYS), व दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्न इत्यादी घटकांचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रमाद्वारे सन १९९० पासून दरवर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाच्या विकासाचे मोजमाप करून मानव विकास निर्देशांकाद्वारे देशाच्या विकासाची क्रमवारी लावली जाते.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :**

१) महाराष्ट्रातील मराठवाडा प्रादेशिक विभागाचा मानव विकास निर्देशांक अभ्यासणे.

२) मराठवाडा प्रादेशिक विभागातील जिल्ह्यांअंतर्गत मानव विकास निर्देशांकाचा सापेक्ष दर अभ्यासणे.

**संशोधनाची गृहीतके (Hypotheses) :**

१) महाराष्ट्रातील मराठवाडा प्रादेशिक विभागाचा मानव विकास निर्देशांक कमी आहे.

२) मराठवाडा प्रादेशिक विभागातील जिल्ह्यांअंतर्गत मानव विकास निर्देशांकाच्या दरात तफावत आहे.

**संशोधनाची पद्धती (Methodology) :**

प्रस्तुत विषयाच्या शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून, द्वितीय माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांक तयार करण्याची पध्दती :**

भारतातील एक प्रगतशील राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची ओळख आहे. महाराष्ट्र शासनाने केंद्रीय नियोजन मंडळ व यु.एन.डी.पी. यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वप्रथम सन २००२ मध्ये पहिला राज्यपातळीवर स्वतंत्र मानव विकास अहवाल प्रकाशित केला या मालिकेतील दुसरा अहवाल सन २०१२ मध्ये प्रकाशित करण्यात आला. महाराष्ट्र शासनाकडून जिल्हा पातळीवर HDI परिगणित करण्यासाठी वापरण्यात आलेले निकष पुढील प्रमाणे आहेत:

**महाराष्ट्र जिल्हानिहाय मानवी विकास निर्देशांक परिगणित करण्यासाठी वापरण्यात येणारे निकष**

| निकष | लघूत्तम मूल्य | महत्तम मूल्य |
|---|---|---|
| अर्भक जीवीतत्त्व दर | १ | १०० |
| साक्षारता दर | ० | १०० |
| स्थूल पटसंख्या प्रमाण | ० | १०० |
| दरडोई निव्वळ अंतर्गत उत्पन्न(चालू किमतीनुसार ₹) | १०,००० | १५०,००० |

**स्रोत :** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२०-२१ अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन नवी मुंबई पृष्ठ क्रमांक २८७

आरोग्य शिक्षण व उत्पन्न या आयामाचे निर्देशांक ,खालील सूत्राद्वारे परिगणित केले जातात.

$$Ix = \text{‘X’ आयामांचा निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{लघुत्तम मूल्य}}{\text{महत्तम मूल्य} - \text{लघुत्तम मूल्य}}$$

शिक्षणाच्या निर्देशांकाची परिगणना साक्षरतेला दोन-तृतीयांश व पट नोंदणी दराला एक-तृतीयांश भारांक )weight) देऊन करण्यात येते. आरोग्य निर्देशांक, शिक्षण निर्देशांक, व उत्पन्न निर्देशांक या तिन्ही निर्देशांका च्या सरासरी द्वारे मानव विकास निर्देशांक काढला जातो. प्रशासकीय सोयीसाठी महाराष्ट्र राज्याची विभागणी ३६ जिल्हे व कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, व नागपूर ह्या ६ महसुली विभागात करण्यात आली आहे. प्रादेशीक दृष्ट्या महाराष्ट्राचे कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा, विदर्भ असे पाच प्रादेशिक विभाग पडतात. महाराष्ट्र मानव विकास अहवाल वर्ष २००२ व वर्ष २०१२ नुसार कोकण विभागाचा मानव विकास निर्देशांक सर्वात जास्त असून तो दोन वर्षात अनुक्रमे ०.६९८ व ०.७७७ एवढा आहे तर . सर्वात कमी मानव विकास निर्देशांक मराठवाडा विभागाचा असून तो दोन वर्षात अनुक्रमे ०.५८६ व ०.६७१ एवढा आहे. महाराष्ट्रात कोकण विभाग सर्वात विकसित असून मराठवाडा विभाग सर्वात मागास व विकसनशील विभाग आहे.

**मराठवाडा प्रादेशिक विभागाचा मानव विकास निर्देशांक :**

महाराष्ट्रातील प्रादेशिक विभागांपैकी मराठवाडा हा सर्वात मोठा विभाग असून या अंतर्गत छत्रपती संभाजी नगर, जालना, परभणी लातूर ,हिंगोली ,नांदेड ,, उस्मानाबाद आणि बीड या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. छत्रपती संभाजीनगर मराठवाडा विभागाची राजधानी व प्रमुख औद्योगिक शहर असून नांदेड जिल्हा मराठवाड्याची उपराजधानी म्हणून ओळखला जातो. मराठवाड्याचे क्षेत्रफळ ६४५९० चौ.कि.मी. असून महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या १६.६७लोकसंख्या % मराठवाडा विभागांतर्गत राहते. महाराष्ट्र मानव विकास अहवाल वर्ष २००२ आणि वर्ष २०१२ नुसार मराठवाड्यातील जिल्हा निहाय मानव विकास निर्देशांक पुढील तक्त्यामध्ये दर्शवण्यात आला आहे:

**मराठवाड्यातील जिल्हा निहाय मानव विकास निर्देशांक**

| जिल्हा | HDI २००१ | क्रमांक | HDI २०११ | क्रमांक | HDI दशवार्षिक वृद्धीदर |
|---|---|---|---|---|---|
| छत्रपती संभाजी नगर | ०.६५० | १ | ०.७२७ | १ | ११.८४ |
| जालना | ०.५५४ | ८ | ०.६६३ | ५ | १९.६८% |
| परभणी | ०.५७८ | ५ | ०.६८३ | २ | १८.१६% |
| नांदेड | ०.५५८ | ७ | ०.६५७ | ६ | १७.७४% |
| हिंगोली | ०.५६१ | ६ | ०.६४८ | ८ | १५.५०% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लातूर | ०.५९५ | ३ | ०.६६३ | ४ | ११.४२% |
| उस्मानाबाद | ०.५८८ | ४ | ०.६४९ | ७ | १०.३७% |
| बीड | ०.६०६ | २ | ०.६७८ | ३ | ११.८८% |
| मराठवाडा | ०.५८६ | - | ०.६७१ | _ | १४.५०% |

**स्त्रोत:** Maharashtra Human Development Report 2012,Sage Publication India Pvt Ltd, New Delhi. P.No. 14.

उपरोक्त तक्त्यामध्ये मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांचा वर्ष २००२ व वर्ष २०१२ च्या मानव विकास अहवालानुसार मानव विकास निर्देशांक व निर्देशांका नुसार जिल्ह्यांचा मराठवाड्यातून क्रमांक दर्शवण्यात आला आहे. तसेच HDI मूल्याचा दशवार्षिक वृद्धीदर काढण्यात आला आहे. वर्ष २००२ व वर्ष २०१२ या दोन्ही अहवालानुसार छत्रपती संभाजी नगर मराठवाड्यात पहिला क्रमांकावर असून या जिल्ह्याचा HDI दोन वर्ष अनुक्रमे ०.६५० व ०.७२७ असा आहे. तर वर्ष २००२ च्या अहवाला नुसार मराठवाड्यात जालना जिल्ह्याचा निर्देशांक सर्वात कमी ०.५५४ होता आणि २०१२ च्या अहवालानुसार हिंगोली जिल्ह्याचा निर्देशांक सर्वात कमी ०.६४८ असा आहे. दशवार्षिक वृद्धी दराचा विचार करता HDI मध्ये सर्वात जास्त प्रगती जालना जिल्ह्याने केलेली आहे तर सर्वात कमी प्रगती उस्मानाबाद जिल्ह्याने केलेली आहे. मराठवाडा विभागाचा मानव विकास निर्देशांक वर्ष २००२ व वर्ष २०१२ नुसार अनुक्रमे ०.५८६ व ०.६७१ असून दहावर्षात HDI मध्ये १४.५०वृद्धी केलेली आहे %.

**निष्कर्ष (conclusion) :**

१) महाराष्ट्रात मराठवाडा विभाग सर्वात मागास व विकसनशील विभाग आहे. मराठवाडा विभागातील सर्वात विकसित जिल्हा छत्रपती संभाजी नगर असून सर्वात मागास जिल्हा उस्मानाबाद जिल्हा आहे.

२) वर्ष २००२-२०१२ ह्या दशकामध्ये जालना, परभणी, नांदेड, हिंगोली ह्या जिल्ह्यांनी चांगली प्रगती केली आहे. तर बीड, लातूर, छत्रपती संभाजीनगर , उस्मानाबाद या जिल्ह्यांनी कमी प्रगती केल्याचे दिसते.

३) मराठवाड्यातील जिल्ह्यांअंतर्गत मानव विकास निर्देशांकात बरीच तफावत असल्याचे दिसून येते. वर्ष २०१२ च्या अहवालानुसार छत्रपती संभाजी नगर, परभणीबीड ,, लातूर ह्या जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक चांगला असून हे मराठवाड्यातील विकसित जिल्हे म्हणून ओळखले जातात. तर जालना,नांदेड उस्मानाबाद, व हिंगोली हे चार विकसनशील जिल्हे म्हणून ओळखले जातात

**शिफारस (Suggestions) :**

महाराष्ट्रातील अति मागास जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक उंचावण्यासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे ६ जून २००६ रोजी म'हाराष्ट्र मानव विकास मिशनची ' स्थापना करण्यात आली होती. १२ अतीमागास जिल्ह्यातील २५ तालुक्यांचा समावेश या मिशन अंतर्गत करण्यात आला होता. ह्यात एकट्या मराठवाडा विभागातील जालना, नांदेड, हिंगोली , परभणी, उस्मानाबाद व लातूर हे सहा जिल्हे समाविष्ट होते. यावरून पुर्णतः मराठवाडा विभागाचा मागासलेपणा दिसून येतो. या मिशन अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या विभिन्न योजनांमुळे मराठवाड्यातील जिल्ह्यांची चांगली प्रगती होत आहे. वर्ष २०११ मध्ये या कार्यक्रमाची व्याप्ती महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यातील १२५ तालुक्यांपर्यत वाढवण्यात आली. या मध्ये मराठवाड्यातील जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. लातूर जिल्हा या मिशन मधून काढून टाकण्यात आला आहे. या मिशन अंतर्गत शिक्षणव उत्पन्न विषयक ,आरोग्य , विभिन्न योजना व कार्यक्रम राबविण्यात येतात. यामुळे मराठवाड्यातील जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक उंचावण्यासाठी मदत झाली आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा हा अतिशय मागास विभाग असल्यामुळे या मिशन अंतर्गत मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश करणे आवश्यक असून मिशन अंतर्गत राबवण्यात येणार्या योजनांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करणे अत्यावश्यक आहे.

**सारांश (Summary) :**

महाराष्ट्रातील मराठवाडा प्रादेशिक विभाग अति मागास असल्याचे कारण म्हणजे मराठवाड्यातील सर्व जिल्ह्ये मागासलेले आहेतछत्रपती संभाजीनगर सोडल्यास . इतर जिल्ह्यांचा विकास झालेला नाही. म्हणून जर मराठवाडा प्रादेशिक विभागाला विकसित करावयाचे झाल्यास विभागातील सर्व जिल्ह्यांकडे समप्रमाणात लक्ष देणे गरजेचे आहे. मानवी विकासासाठी मानवी भांडवलात दीर्घकालीन गुंतवणूकीची आवश्यकता आहे व ती गुंतवणूक लोकांच्या आरोग्यासाठी, शिक्षणासाठी, त्यांचे कौशल्य विकसित करणे इ. स्वरूपात केली, तरच ती शाश्वत गुंतवणूक होऊ शकते.

**संदर्भसूची (References) :**

1. अच्युत गोडबोले, अर्थात (अर्थशास्त्राचा इतिहास, सिद्धांत अन चरित्र यांची रंजक सफर), राजहंस प्रकाशन, प्रा. लि. पुणे, २०११
2. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२०-२१, अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, नवी मुंबई.
3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग

https://arogya.maharashtra.gov.in/Site/Form/DiseaseContent.aspx?CategoryDetailsID=LA8ANov9Eq4

4. मानव विकास केंद्र, यशदा, पुणे. https://www.yashada.org/yashada_2019/dept_chd.php
5. मिश्रा आणि पुरी: भारतीय अर्थव्यवस्ता, हिमालया पब्लिकेशन, २००६.
6. Maharashtra Human Development Report 2012, Sage Publication India Pvt Ltd, New Delhi.
7. UPND Human Development Report: Oxford University Press, Delhi, 1990.
8. UPND Human Development Report: Oxford University Press, Delhi, 2020. https://www.undp.org/https://en.wikipedia.org/wiki/Human_Development_Index